# माझे शिक्षण विषयक प्रयोग

माझ्या शिक्षणाविषयक प्रयोगांविषयी मी आजवर कुठे लिहिले नाही. याचे कारण असे की, प्रयोग सांगायचे तर, त्यांचे सिध्द झालेले फलीतही सांगितले पाहिजे. परंतु स्वयंपाकातल्या एखाद्या पदार्थ्याच्या प्रयोगासारखे शिक्षणातल्या प्रयोगांचे फलीत लगेच मिळत नसते. त्याच्या यशापयशाची निष्पत्ती इतकी चटकन मिळत नसते. शिक्षणाची प्रक्रियाच मुळी सातत्यपूर्ण दीर्घकालीन प्रक्रिया असते. आज पेरलेले उगवायला फार काळ जावा लागतो. त्यामुळे, प्रयोगाच्या सुरुवातीला किंवा मध्याला निष्कर्षात्मक काही बोलणे शक्यही नसते व उचितही नसते. तरीही काही सांगायचे म्हटले तर, प्रयोगाची सुरुवात का व कशी झाली आणि त्याची आजवरची वाटचाल कोणत्या दिशेने चालली आहे. इतपतच सांगता येईल. या लेखात असाच काहीसा प्रयत्न केला आहे.

आणखी एक गोष्ट सुरुवातीलाच स्पष्ट केली पाहिजे. माझे शिक्षणातले 'सर्व प्रयोग' हे ' आमचे' प्रयोग आहेत. एकाच माणसाने एकट्यानेच काम करण्याचे नि केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचे शिक्षण हे क्षेत्रच नव्हे ! प्रत्येकच काम सांघिकतेने करावे लागते. अर्थातच त्याच्या यशापयशाचे धनी त्यातील सर्व सहभागी असतात. शिवाय, आम्ही केलेल्या सर्वच शिक्षणविषयक प्रयोगांना संस्थात्मक आधार आहे. प्रामुख्याने ग्राममंगल या संस्थेकरवी, तिच्या सर्व शक्तीनिशी हे प्रयोग केले गेले आहेत.. आणि तिला इतर अनेक संस्थांचे सहाय्य झाले आहे. यांमध्ये, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद, होमी भाभा विज्ञान शिक्षणकेंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतील.. अशा अनेक संस्थांबरोबरच अनेक व्यक्तींचेही श्रम या कार्यात कारणी लागले आहेत. थोडक्यात असे की, आमचे सर्व शैक्षणिक प्रयोग म्हणजे संघटितरित्या केलेले प्रयत्न आहेत. सगळयांचे बळ एकवटून झालेले हे प्रयोग आहेत.

आपण करीत असलेल्या कामात काही प्रश्न अपरिहार्यपणे समोर उभे ठाकतात. आपण त्यांना न टाळता, ते सरळपणे अंगावर घ्यायचे ठरविले की, प्रयोगांसाठी भूमी नांगरली जाते. ते प्रश्न सोडविण्यासाठी काही कृती विचारपूर्वक आणि त्यासाठी आवश्यक तो अभ्यास करून, करायची ठरवली की, फुले फुलतात इतक्या सहजपणे प्रयोगांना सुरुवात होते, आणि मग ते प्रयोगच तुम्हाला हात धरून पुढ नेतात. ग्राममंगल संस्थेचे, ग्रामीण-आदिवासी भागांतील मुलांच्या शिक्षणाचे आव्हान पेलू पाहताना, असेच काहीसे घडत गेले. थोडेसे कळून-सवरून आणि बरेचसे नकळत. ग्राममंगलचे पहिले-वहिले आणि आजवरचे प्रमुख काम डहाणू तालुक्यात ऐना-दाभोण-रणकोळ या गावांमधील आदिवासी पाड्यांवर सुरू झाले. तेथे छोट्या छोट्या शाळा उभ्या राहिल्या, पण, वारली - कातकरी मुलांची विशिष्ट बोली आणि शिकण्याशिकविण्याचे प्रमाण मराठी भाषा यांच्यात मेळ घालून मुलांचे शिक्षण पुढे कसे न्यावे, या प्रश्नाशी सुरुवातीलाच भिडावे लागले.सुरुवातीला तरी हा प्रश्न सोडविण्यासाठी आमचा भर विचारांवर नव्हता तर व्यक्तींवर होता. म्हणजे असे की, गावातल्याच दहावीपर्यंत शिकलेल्या मुलांना शिक्षक बनवून त्यांच्यावर प्रश्न सोडविण्याची भिस्त होती कारण ही मुले त्याच समाजातील

होती, मुलांशी आपल्याच भाषेत संवाद साधू शकत होती. शिवाय, त्यांच्याकरवी, आम्ही पांढरपेशी मंडळी आणि आदिवासी गावकरी व मुले यांच्यातील अंतरही भरून निघणार होते. पण हे पुरेसे नव्हते. भाषा हे शिक्षणाचे व त्याकरवी परस्पर संवादाचे, विचार करण्याचे साधन व्हायचे असेल तर प्रमाण भाषेचे स्थान अनिवार्य होते. त्यामुळे मुलांना त्यांच्या बोलीकडून प्रमाण भाषेकडे कसे वळवावे हा प्रश्न प्रामुख्याने समोर उभा ठाकला. मग इतर ठिकाणी हा प्रश्न कसा सोडविला जातो याचा शोध घेतला. दोन विचारप्रवाह व प्रयत्नप्रवाह आढळले. काही लोकांनी बोली भाषेतच पुस्तके तयार करण्यावर भर दिला होता. शिक्षणाच्या अगदी सुरुवातीच्या अवस्थेत याला काही अर्थही होता. शिक्षणाच्या प्रांगणात प्रवेश करण्यासाठी त्याचा उपयोग होणार होता. परंतु व्यामिश्र ज्ञानाच्या क्षेत्रात पुढे वावरायचे असेल तर प्रमाण भाषेला पर्याय नव्हता. म्हणजे पुन्हा बोलीकडून प्रमाणभाषेकडे वळण्याचा पेच कायमच राहत होता. सरकारी शाळांतून विचारांचा दुसरा प्रवाह होता. सरधोपटपणे पहिलीपासूनच प्रमाण भाषेतील क्रमिक पुस्तकांना मुलांना भिडावे लागत होते. आणि व्यवहारात तिथेच तर नेमकी अडचण यत होती. मुलांची मोठ्या प्रमाणावर शाळांतूनच गळती होण्याचे हे एक प्रमुख कारण होते. मग आम्ही तिसराच मार्ग काढला. बोलीतील सर्व शब्द प्रमाण मराठी भाषेतच जमा केले. शब्द कोणतेही वापरले तरी चालेल, व्याकरण, वाक्यरचना मात्र प्रमाण मराठीची असली पाहिजे. ही शिडी उपयुक्त ठरली. आजही, आम्हाला असे वाटते की, मराठीशी संलग्न सर्व बोलीमधील सर्व शब्दांना मराठी शब्द म्हणून मान्यता द्यावी. आणि मराठी भाषेचा आवाकाच विस्तारावा.

ग्राममंगल आणि तिच्यानंतर स्थापन झालेली महाराष्ट्र बालशिक्षण परिषद या संस्थांचा एक अभ्यासगट, अनेक वर्षे कार्यरत होता. शिक्षणाला आधारभूत असणाऱ्या वेगवेगळया शास्त्रांचा, त्यांतील अत्याधुनिक संशोधनांचा, त्यांवर आधारित शिक्षणविषयक नवविचारांचा धांडोळा घेण्याचे काम प्रामुख्याने या अभ्यास गटांत होत असे. त्याचबरोबर आजूबाजूचे प्रचलित, पठडीबध्द शिक्षण आणि शिक्षणांतील संशोधित नवविचार यांची सांगड घालण्याच्या प्रयत्नांतून, शिक्षणात मूलभूत परिवर्तनच झाले पाहिजे. हा विचार बळावला, आणि पाठोपाठ त्याचे छोटेमोठे प्रयोग सुरू झाले. अनेक शैक्षणिक साधनांचे संकलन व नवनिर्मिती, वयोमानानुसार विकासाभिमुख असे उपक्रम व यांच्या अनुषंगाने काही लेखन, कार्यकर्त्यांकडून होऊ लागले. यातून शिशुवाडी नि बालवाडीचे बळकट शास्त्रीय पायांवर प्रत्यक्षातले नमुने उभे राहिले. पुढे हीच प्रक्रिया प्राथमिक शिक्षणाबाबतही होऊन दर्जेदार शिक्षणासाठी, सर्वच मुले सहजतेने नि आनंदाने शिकू शकतील असे वर्ग नमुनेही उभे राहिले. थोडक्यात पठडीबध्द शिक्षणाला छेद देणारा पर्यायी शिक्षणाचा नमुनाच त्यांतून तयार झाला. शिक्षणात, सार्वत्रिकरित्या परिवर्तनाची वाट चालता येण्याच्या शक्यता त्यांतून उभ्या राहिल्या. महाराष्ट्रातील इतरही काही शाळांनी या नव्या शिक्षणपध्दतींचा स्वीकार करायला सुरुवात केली. ग्राममंगलने सल्लागाराच्या भूमिकेतून त्यांना मदत करायला सुरुवात केली.

परिवर्तनासाठी, पर्यायी शिक्षणरचनेचा प्रसार होण्याकरिता, संभाषणे, भाषणे, प्रदर्शने, प्रशिक्षण व प्रबोधन कार्यक्रम, लेख व ग्रंथलेखन आणि इतर शाळांना सल्लागार म्हणून काम करून, त्या त्या ठिकाणी

परिवर्तीत वर्गरचनेचे नमुने उभे करणे अशी विविध कामे ग्राममंगलमध्ये होऊ लागली, अशाच कामाचा एक भाग म्हणून 'मूल शिकते कसे ?' असा एक दीड-दोन दिवसांचा, शास्त्रीय अंगाने मुले समजावून घेण्याचा, पालक, शिक्षक व संस्थाचालक यांच्या प्रबोधनाचा कार्यक्रम ठिकठिकाणी करण्यात आला. मुलांविषयीचे, त्यांच्या वाढीविषयीचे आणि त्यांच्या शिकण्याच्या नैसर्गिक पध्दतींविषयीचे खूपच नवे आकलन या कार्यक्रमाने येत असे. मुलांशी वागताना आपले चुकते कुठे आणि प्रचलीत शिक्षण मुलांच्या नैसर्गिक गरजांच्या विरोधी काम कसे व किती करते याचे भानही प्रामुख्याने पालकांना येत असे. यांतूनच, ताणपूर्ण शालेय शिक्षण पूर्णतः नाकारणारा असा पालकांचा एक गट उभा राहिला, त्यांनी आपल्या मुलांना शाळेत न घालण्याचा आणि घातलेली मुले शाळांतून काढून घेण्याचा निर्णय घेतला, मग या मुलांचे शाळाबाहेर परंतु आनंदमय आणि शास्त्रीय पध्दतीने शिक्षण होण्यासाठी, पालकांच्याच पुढाकाराने पुण्यामध्ये 'शिकत्या घरां चा' (लर्निंग होम) चा प्रयोग उभा राहिला. वास्तविक या मुलांना बाहेरून शालांत परीक्षेस बसता यायला हवे. परंतु शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची भाषा करणारे सरकार मात्र, सर्वांनी शासनमान्य शाळांतूनच शिक्षण घेतले पाहिजे, असा आग्रह धरीत आहे. सरकारी मालकीच्या वा मान्यतेच्या शाळांबाहेर जणू शिक्षणच असू शकत नाही, अशी सरकारची अवास्तव भूमिका आहे.

पुण्यामधील लर्निंग होम हीच एक शिक्षणविषयक अगदी बारकाव्याने प्रयोग करणारी प्रयोगशाळा आज बनली आहे. मेंदू आधारित शिक्षण बहुविध बुध्दिमत्तांवर आधारित शिक्षण असा, अत्याधुनिक सैध्दांतिक विचार आणि दैनंदिन शिक्षणव्यवहार यांची कलात्मक सांगड घालण्याचा प्रयोग येथे होत आहे.

अगदी अलीकडे या 'शिकत्या घरा' चे कार्य पुण्यातील गांधीभवनच्या प्रांगणात सुरू झाले आहे. ग्राममंगल आणि महाराष्ट्र गांधी सेवा संघ यांनी या प्रयोगात एकत्र यायचे ठरविले आहे. गांधीजींचा शिक्षण स्वावलंबनाचा विचार आणि शरीर-मन-बुध्दी यांच्या समन्वयाने परिपूर्ण शिक्षणाच्या ध्येयाकडे जाण्याचा एक नवा प्रयोग येथे उभा राहत आहे. गांधी विचारातील व्यावहारिकता जोखून पाहत असतानाच तिचे आधुनिक मूल्याधिष्ठित लोकशाही समाजरचनेच्या उद्दिष्टाशी नाते जोडण्याचा प्रयोग येथे मूळ धरत आहे. विद्यार्थी-शिक्षक-पालक यांनी, पर्यावरणस्नेही आणि बऱ्याचशा टाकाऊ सामानातून आपल्या 'शिकत्या घरांचे' बांधकाम करण्याचा घातलेला घाट, या दिशेने होणारी वाटचाल, आजच सूचीत करीत आहे.

याच सैद्धांतिक स्तरावरून पुढे जाणारा आणखी एक प्रयोग आहे तो 'हॉबी होम्स' चा ग्राममंगल आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांचा संयुक्तरित्या उभा केलेला हा प्रयोग आहे. (आपले सारे शालेय शिक्षण), बुध्दिमत्ता ही एक सर्वसामान्य क्षमता असून ती विद्यार्थ्याला कमी -अधिक प्रमाणात आनुवंशिकतेने आलेली असते. हेच एक गृहीत धरून मुलांच्यात हुशार व ढ अशी अन्यायकारक वर्गवारी करीत असते. बुध्दीच्या क्षेत्रातील आधुनिक संशोधन मात्र असे सांगते की, बुध्दिमत्ता अनेक प्रकारच्या असतात आणि प्रत्येकजणच विविध बुध्दिमत्तांचा विशिष्ट पट घेऊन जन्माला येतो. म्हणूनच समाजात नेहमीच विविध बुध्दिमत्तांचे प्रगल्भ आविष्कार आढळून येतात. या दिशेने पुढची पिढी जाण्यासाठी सर्वच बुध्दिमत्तांच्या विकासाला संधी, सर्व

मुलांना लहान वयातच मिळण्याची गरज आहे. आजच्या शालेय रचनेत या कार्याला फारसा वाव नाही, हे जोखून मोठ्या संख्येने 'हॉबी होम्स' काढून ठिकठिकाणच्या सहा ते चौदा वयांतील मुला-मुलींच्या बुध्दिमत्ता विकासाचा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. आणि महाराष्ट्रात काही ठिकाणी तो सुरूही झाला आहे. या 'हॉबी होम्स' मध्ये जाणाऱ्या मुलांना, त्यांच्या होणाऱ्या क्षमता विकासाचा त्यांच्या शालेय जीवनात तर फायदाच होईल. पण उपजत बुध्दिमत्तांना विकासाची संधी मिळाल्यामुळे त्याचा फायदा जीवनात , आपापल्या कार्यक्षेत्रांमध्येही होईल. या नवप्रयोगाचा एक व्यावहारिक फायदा असा आहे की, 'हॉबी होम्स' चालवणे हा बौध्दिक क्षेत्रातील एक नवा व्यवसायच तरूणासाठी उपलब्ध झाला आहे.

व्यवहारांतील प्रश्न हेरणे व त्यांवरील उत्तरे शोधणे हे शिक्षणक्षेत्रातील प्रयोगांचे प्रधान उद्दिष्ट असते. गेली काही वर्षे महाराष्ट्रात मराठी माध्यमाचे अवमूल्यन होत आहे. मराठी शाळांना गळती लागली आहे आणि हजारो मराठी मुले इंग्रजी माध्यमांतून शिकू पाहताहेत. वास्तविक जगातील सर्वच शिक्षणतज्ज्ञ, प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या पहिल्या भाषेतून शिकण्याचा आग्रह धरतात. कारण त्याने शिक्षण सहजपणे आणि प्रभावी रीतीने होते. परंतु पालकांना शिक्षणाच्या दर्जापेक्षा इंग्रजी भाषेचे आकर्षण अधिक आहे. ते आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत अडकवतात ते इंग्रजी यावे म्हणून. कारण उघड आहे. मराठी माध्यमाच्या शाळेत जाऊन इंग्रजी काही येत नाही. अगदी पहिली ते दहावी अशी दहा वर्षे शिकूनही इंग्रजी येत नाही, याचा अर्थच मुळी असा आहे की, शाळाशाळांतून, सरकारी सक्तीने, क्रमिक पुस्तकाकरवी, प्रश्नोत्तरे लिहून, भरपूर गुण मिळवून, इंग्रजी शिकण्याची राबविलेली पध्दत चुकीची आहे. यातून मुलांना इंग्रजी येत नाही हे स्पष्ट दिसूनही आपण बदल करू इच्छित नाही. ही फारशी शहाणपणाची गोष्ट नाही.

ग्राममंगलने, मुलांना आपली मराठी ही पहिली भाषा उत्तम त-हेने यावी, सर्व विषयांचे ज्ञान आपल्या भाषेतून सहजपणे घेता यावे आणि त्याचबरोबर इंग्रजी भाषेशीही तितक्याच सहजतेने सलगी करता यावी; ही भूमिका समोर ठेवून एका नव्या प्रयोगाला हात घातला आहे.

ग्राममंगलने नवीन प्रयोग सुरू केला आहे तो 'द्विभाषा समृध्दी प्रकल्पाचा' मराठी शाळांतील मुलांना, सातवीपर्यंतच मराठी आणि इंग्रजी दोन्हीही भाषा उत्तम याव्यात अशा त-हेने हा कर्यक्रम तयार करण्यात आला आहे. प्रत्यक्ष प्रयोगही नुकताच सुरू झाला आहे.

शालेय शिक्षणाचा आणखी एक मोठा प्रश्न आहे तो शिक्षणाच्या ढाचा. एकूणच शिक्षण मुलांना नि शिक्षकांनाही रसहीन आणि कंटाळवाणे झाले आहे. अनुत्तीर्णतेचे नि गळतीचे प्रमाणही मोठे आहे. विद्यार्थ्यांना चढविण्याचाच प्रघात आणि प्रयत्न असल्यामुळे, फारसे काही हाती न लागताच मुले शालांत परीक्षेचा उंबरठा पार करतात आणि बाजारातील आपल्या किंमतीचा अंदाज येऊन हवालदिल होतात. सर्वच मुले शाळेत शिकतात म्हणजे शाळेच्या वर्गातून शिकतात.मात्र या वर्गाचे वातावरण शिकण्याला पोषक नसते. हारीने, गर्दीगर्दीने बाकांवर गच्च बसलेली मुले, शिकण्याच्या ताणाखाली, परावलंबनाने शिकू पाहतात. मुलांच्या

शिकण्याच्या नैसर्गिक पध्दतींशी विसंगत अशी ही व्यवस्था आहे, त्यामुळे तिचा त्याग करून तिच्या जागी संपूर्ण रचनात्मक शिक्षणांची उभारणी करण्याचा पर्याय स्वीकारून ग्राममंगलने, किमान एका शाळेत तरी असा प्रयोग सुरू केला आहे.. आणि याला शिक्षकांचा नि मुलांचा प्रतिसाद फारच चांगला मिळतो आहे. दर्जेदार शिक्षणाचा भावी काळासाठी उपयुक्त असा हा नमुना आहे, असा काहींचा अभिप्राय आहे.

ग्राममंगल ही संस्था गेली अठ्ठावीस वर्षे शालेय शिक्षणाच्या व शालेयपूर्व शिक्षणाच्या बाबतीत जाणतेपणाने कार्य करीत आहे. हे करीत असताना, शेकडो शैक्षणिक साधने आणि अनेक उपयुक्त पुस्तकांची प्रकाशने निर्माण झाली आहेत .'नवे शिक्षण- नव्या दिशा' हाच या सर्व प्रयोगात्मक प्रयत्नांमागचा विचार आहे. गरजेनुसार प्रयोग होत गेले आहेत;

आमच्या या सर्वच प्रयोगांचे, त्यांतील सैध्दांतिक नि प्रत्यक्ष शिक्षव्यवहारांतील बारकाव्यांचे सविस्तर वर्णन करणे, त्यांच्या उपयुक्ततेची शहानिशा करणे, प्रयोगांतील विविधांगी उपक्रमांचे सातत्याने मूल्यमापन करणे आणि त्यायोगे या प्रयोगांच्या यशापयशाबाबत निष्कर्षाला येणे, या सर्व पायऱ्या घेणे, आमच्या परीने चालू आहे. या लेखात केवल प्रयोगांचे स्थूल रूपच सांगितले आहे.

❖